१) लोकमत पान क्र.2

दि. 04/03/2023

दोघांना अटक; पावणेपाच कोटींची ५३ वाहने जप्त

# अवजड वाहने चोरून बनावट कागदपत्रांद्वारे विक्री

लोकमत न्यूज नेटवर्क

**मीरा रोड :** अवजड वाहने चोरून त्यांचे चेसिस व इंजिन क्रमांक खोडत बनावट कागदपत्रांद्वारे विकणाऱ्या आंतरराज्य टोळीचे २२ गुन्हे उघडकीस आणत मीरा भाईंदर - वसई विरार पोलिसांच्या गुन्हे शाखा-१ने पावणेपाच कोटींची ५३ वाहने जप्त केली आहेत. या टोळीच्या म्होरक्यासह दोघांना अटक करण्यात आली आहे. याप्रकरणात आणखी काही आरोपींचा शोध घेण्यात येत असल्याची माहिती पोलिस आयुक्त मधुकर पांडेय यांनी दिली.

काशीमीराच्या सिद्धिविनायक नगरमधील रोझ गार्डनमध्ये राहणारे विनयकुमार पाल यांचा टेम्पो गेल्यावर्षी डिसेंबरमध्ये त्याच्या घरासमोरील रस्त्यावरून चोरीला गेला होता. काशीमीरा पोलिसांनी गुन्हा दाखल करून गुन्हे शाखेचे उपायुक्त अविनाश अंबुरे, सहायक आयुक्त अमोल मांडवे यांच्या मार्गदर्शनाखाली गुन्हे शाखा एकचे पोलिस निरीक्षक अविराज कुराडे, सहायक निरीक्षक पुष्पराज सुर्वे, कैलास टोकले व सुहास कांबळे आणि पथकाने तपास सुरू केला. पोलिसांनी चोरीचा टेम्पो शोधण्यासाठी मुंबई अहमदाबाद महामार्गावरील टोल नाक्यांचे सीसीटीव्ही तपासण्यास सुरुवात केली. महाराष्ट्र, गुजरात महामार्गावरील टोल नाक्यांचे सीसीटीव्ही फुटेजद्वारे शोध घेत थेट राजस्थानच्या पाटोडी टोल नाकापर्यंत पोहोचले. त्यावेळी तिचा क्रमांक बदलून गुजरातचा झाला होता. तसेच गाडीमध्ये काहीसा बदल केला होता. मात्र, फास्टटॅग व गाडीवरील काही खुणांमुळे ती काशीमीरावरून चोरलेली गाडी असल्याचे पोलिसांनी हेरले. तेथूनच ती गाडी पुन्हा गुजरातच्या अहमदाबाद दिशेने आली. नंतर त्या फास्टटॅगचा संपर्क क्रमांक हा फारूख तय्यब खान (३६, रा. फखरुद्दीनका, पो. टपुग्रा, ता. टिजारा, जि. अलवार, राजस्थान) याचा असल्याने पोलिसांनी त्याला पकडले. सोबत त्याचा साथीदार मुबिन हारिस खान (४०) याला अटक केली.

फारूख हा म्होरक्या असून, दोघेही आरोपी वाहनचालक आहेत. पोलिसांनी दोघांची चौकशी करण्यास सुरवात केली असता त्यांनी चोरलेली ४८ आयशर टेम्पो, २ टाटा टेम्पो, १ अशोक लेलॅण्ड टेम्पो व २ क्रेटा कार अशी तब्बल ५३ वाहने. गुजरात, राजस्थान, हरयाणा भागातून जप्त केली. त्या भागातील आणखी १२ आरोपींचा पोलिस शोध घेत आहेत.



अवजड वाहने चोरणाऱ्या टोळीचे तब्बल २२ गुन्हे उघडकीस आणले.

## कमी किमतीत गाड्यांची विक्री

महाराष्ट्र, हरयाणा, उत्तर प्रदेश, दिल्ली आदी राज्यांतून वाहने चोरलेली असून, वाहनचोरीचे २०१७ पासून २०२२ पर्यंतचे २२ गुन्हे पोलिसांनी उघडकीस आणले आहेत. वाहने चोरी करून त्यावरील मूळ इंजिन व चेसिस नंबर खोडून त्यावर बनावट तयार केलेल्या कागदपत्रांप्रमाणेच इंजिन व चेसिस नंबर टाकण्यात आले. त्यानंतर विविध आरटीओ विभागात पुनर्नोंदणी केल्याचे निष्पन्न झाल्याचे पोलिस आयुक्तांनी सांगितले.

२) पुढारी पान क्र.8

# केवळ धर्म वेगळा असणे म्हणजे लव्ह जिहाद नव्हे

**मुंबई : पुढारी वृत्तसेवा**

मुलगा आणि मुलगी वेगवेगळ्या धर्माचे असल्यामुळे त्यांच्या नात्याला धार्मिक रंग देता नाही, असे महत्त्वपूर्ण निरीक्षण मुंबई उच्च न्यायालयाने नुकतेच एका प्रकरणात नोंदवले. या प्रकरणी एका व्यक्तीने महिला व तिच्या आई-वडिलांवर इस्लाम स्वीकारण्यासाठी दबाव टाकल्याचा व आपला सुंता केल्याचा आरोप केला होता.

उच्च न्यायालयाने महिला आणि तिच्या आई-वडिलांना अटकपूर्व जामीन मंजूर करताना हे मत नोंदवले. या प्रकरणाची सुनावणी २६ फेब्रुवारी रोजी न्यायमूर्ती विभा कंकणवाडी व न्यायमूर्ती अभय वाघवासे यांच्या खंडपीठापुढे झाली. तथापि, त्याची यातमी शुक्रवारी उजेडात आली.

## मुंबई हायकोर्टाचे निरीक्षण

संबंधित व्यक्तीने डिसेंबर २०२२ मध्ये आधीची मैत्रीण व तिच्या कुटुंबीयांवर लव्ह जिहादचा गुन्हा दाखल केला होता. त्याने सांगितले होते की, २०१८ पासून तो एका मुस्लिम महिलेसोबत नात्यात होता. तो अनुसूचित जातीचा होता. मात्र, महिलेला त्याची कल्पना नव्हती.

काही दिवसांनंतर त्या महिलेने या व्यक्तीवर इस्लाम स्वीकारण्यासाठी दबाव टाकण्यास सुरुवात केली असता या व्यक्तीने महिलेच्या आई-वडिलांना आपली जात सांगितली.

CS CamScanner
Scanned with CamScanner

३) पुढारी पृ. पान क्र. 2

दि. 04/03/2023

# रेस्टॉरन्ट अँण्ड लॉजिंगमध्ये वेश्याव्यवसाय

## उत्तनमध्ये चौघांना अटक

मिरारोड : पुढारी वृत्तसेवा

उत्तन येथील एका रेस्टॉरन्ट अँण्ड लॉजिंगमध्ये वेश्याव्यवसायासाठी मुली पुरवणाऱ्या हॉटेल मालक, चालक मॅनेजर, दलाल यांच्यावर अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंध कक्ष यांनी कारवाई केली. या प्रकरणी उत्तन सागरी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला आहे. या गुन्ह्यात चार आरोपींना अटक झाली आहे.

उत्तन येथे लॉजचा चालक तपन सेन व मॅनेजर ग्राहकांना वेश्यागमनासाठी मुली, महिला व रूम देत असल्याची माहिती भाईंदरच्या अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंध कक्षाला समजली.

सदर माहितीच्या आधारे पोलीस निरीक्षक समीर अहिरराव यांनी पोलीस पथकासह रेस्टॉरन्ट अँण्ड लॉजिंगमध्ये धाड टाकली. त्यावेळी रेस्टॉरन्ट अँण्ड लॉजिंग, हॉटेलचे चालक तपन समीर सेन व स्टाफ यांनी वेश्यागमनासाठी २ महिला पुरविल्याचे निष्पन्न झाल्याने चालक तपन समीर सेन, मॅनेजर मुन्नाकुमार धानेश्वर सिंग, वेटर साहिल अब्दुलकदुस इस्लाम, वेश्यादलाल शाहबुल मोमताज मंडल यांना ताब्यात घेतले व पाहिजे आरोपी ग्रीन विला रेस्टॉरन्ट अँण्ड लॉजिंगचे मालक राजश्री पाटील, व वेश्यादलाल रमेश यांच्या विरुद्ध उत्तन सागरी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. २ पीडित महिलांची सुटका करण्यात आली आहे.

आपल्या आजूबाजूला कुठल्याही प्रकारे गैरधंदे सुरू असल्यास त्वरित पोलिसांशी संपर्क साधावा, असे आवाहन या गुन्ह्यांच्या अनुषंगाने पोलिसांनी नागरिकांना आवाहन केले आहे. आपला परिसर गुन्हेगारीमुक्त राहण्यासाठी पोलिसांच्या उक्रमात सहभागी व्हा, असेही आवाहन पोलिसांनी केले आहे.

४) सकाळ पान क्र. 2

# आर्थिक ताळेबंद पाहून पेन्शनचा निर्णय

## देवेंद्र फडणवीस यांचे स्पष्टीकरण

मुंबई, ता. ३ : आर्थिक ताळेबंद पाहून पेन्शनचा निर्णय घेणार असल्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधान परिषदेत सांगितले. अधिवेशन संपल्यानंतर जुन्या पेन्शन योजनेसाठी बैठक घेणार असून २००५ नंतर सेवेत आलेल्या कर्मचाऱ्यांना निवृत्ती जवळ आलेली नाही. आम्ही जुन्या पेन्शन योजनेसाठी नकारात्मक नाही असेही त्यांनी स्पष्ट केले.

फडणवीस म्हणाले, 'कुठल्याही राज्यकर्त्यांना वाटत नाही की, आपले कर्मचारी हे असंतुष्ट राहावे, ते संतुष्ट असावेत यासाठी प्रत्येक राजकारणी प्रयत्न करत असतो. केवळ घोषणा करायची असेल तर पुढची निवडणूक निघून जाईल. मात्र, राज्यकर्त्यांनी भविष्याचा विचार केला पाहिजे.' आपला खर्च हा एकूण ५८ टक्क्यांपेक्षा जास्त आहे. यंदा तो ६२ टक्क्यांवर गेला आहे. पुढील वर्षी तो ६८ टक्के जाईल. जुन्या पेन्शन योजनेसाठी आर्थिक ताळेबंद पाहून निर्णय घ्यावा लागणार असल्याचे फडणवीस यांनी सांगितले.



'कर्मचाऱ्यांचे पगार द्यायचे आहेत, रस्ते बांधायचे आहेत, विकास करायचा आहे, एससी आणि एसटीसाठी स्कॉलरशिप द्यायची आहे. या सगळ्या गोष्टींसाठी परिस्थिती राहिली पाहिजे. संघटनांसोबत मी अधिवेशनानंतर संपूर्ण दिवस चर्चा करणार असून त्यांनी दिलेला पर्याय उत्तम असेल तर तो आम्ही स्वीकारू,'' असेही देवेंद्र फडणवीस यांनी स्पष्ट केले आहे.

### 'एक तास विशेष चर्चा करावी'

जुन्या पेन्शन योजनेबाबत राज्य सरकार काय निर्णय घेते, यावर संपूर्ण महाराष्ट्राचे लक्ष लागून राहिले आहे. त्यामुळे अधिवेशनानंतर उपमुख्यमंत्र्यांनी याबाबत कर्मचारी, शिक्षक संघटनांबरोबर बैठक जरूर घ्यावी. मात्र, त्या आधी हा मुद्दा ९७ मध्ये रूपांतरित करून चालू अधिवेशनात १५ मार्चच्या आत सकाळच्या सत्रात एक तास विशेष चर्चा करावी, अशी सूचना विधान परिषदेच्या उपसभापती नीलम गोऱ्हे यांनी केली.

५) म.टा. पान क्र.7

# 'पोलिस भरतीतील गैरसोयी दूर करा'

म. टा. खास प्रतिनिधी, मुंबई



मुंबईतील पोलिस भरतीसाठी येणाऱ्या उमेदवारांची गैरसोय होत असल्याचे सांगत विरोधी पक्षनेते अजित पवार यांनी शुक्रवारी राज्य सरकारला धारेवर धरले. या भरतीदरम्यान अनेक दुर्दैवी घटना घडल्या आहे. त्या टाळण्यासाठी शारीरिक चाचण्या पहाटे ४ ते सकाळी १० या वेळेत करण्यात यावी, अशी मागणी यांनी यावेळी केली.

विधानसभेत 'पॉइंट ऑफ इन्फॉर्मेशन'च्या माध्यमातुन पोलिस भरती केंद्रांवरच्या गैरसोयींचा मुद्दा उपस्थित करण्यात आला. 'पोलिस शिपाई भरतीसाठी, इंजीनिअर, डॉक्टर, एमबीए, एमएससी झालेले तरुण येतात. उच्चशिक्षण घेऊनही नोकऱ्या नसल्याने ते पोलिस भरतीसाठी येतात. त्यांची काळजी घेणे ही आपली, सरकारची जबाबदारी आहे. कालिना कॅम्पसमध्ये भरतीवेळी गणेश उगले या १७ वर्षांच्या तरुणाला १,६०० मीटर धावल्यानंतर चक्कर येऊन मृत्यू झाला, तर अमर अशोक सोलंके या २७ वर्षीय तरुणाचाही हृदयविकाराचा झटका येऊन मृत्यू झाला. या दुर्घटनांची पुनरावृत्ती टाळली पाहिजे', असे पवार म्हणाले.

CamScanner

Scanned with CamScanner

6) लोकमत पृ. पान क्र. 1

दि. 04/03/2023

# पैसे कमविण्याचा नादात पदरचे चार लाख घालवले

## भाईंदरमधील महिलेची सायबर लुटारूंकडून फसवणूक

लोकमत न्यूज नेटवर्क

मीरा रोड : रोज दोन ते पाच हजार कमविण्याचे प्रलोभन दाखवून कॉईनलिस्ट प्रोवर खाते उघडायला लावून भाईंदरमधील महिलेची सायबर लुटारूंनी चार लाखांची फसवणूक केली आहे.

भाईंदर पूर्वेच्या न्यू गोल्डन नेस्ट भागात राहणाऱ्या प्रीती मोडक एका कंपनीत नोकरीला असून, त्यांचे पती हे खासगी बँक शाखेत व्यवस्थापक आहेत. त्यांना अनोळखी व्यक्तीने व्हॉट्सॲपवर संदेश पाठवून पार्टटाइम काम करून दिवसाला दोन ते पाच हजार रुपये कमविण्याचे प्रलोभन दाखविले.

त्यासाठी एका टास्कसाठी ५० रुपये भरून दिवसाला २४ टास्क करण्यासाठी सांगण्यात आले. नंतर त्यांना टेलिग्रामवर लिंक पाठवून टास्क कोड देण्यात आला. त्यांनी अनोळखी व्यक्तीला स्वतःचा युपीआय आयडी, बँक खाते क्रमांक, व्हॉट्सॲप क्रमांक आदी माहिती दिली. प्रीती यांना कॉईनलिस्ट प्रोवर खाते उघडायला लावले. वेळोवेळी प्रीती यांनी आलेले टास्क पूर्ण केले आणि त्यानुसार त्यांच्या कॉईनलिस्ट प्रो खात्यावर पैसे जमा झाल्याने त्यांचा विश्वास बसला. नंतर प्रीती यांना विविध युपीआय आयडी व अन्य ऑनलाइन पर्यायांमार्फत रक्कम ट्रान्सफर करण्याचा टास्क देण्यात आला. त्यानुसार प्रीती यांनी स्वतःसह पती ओमकार, नणंद जुईली यांच्या खात्यातून मिळून सुमारे ४ लाख रुपये ट्रान्सफर केले.



- कॉईनलिस्ट प्रो खात्यावर ५ लाख ३६ हजार इतकी रक्कम जमा झाल्याची त्यांना दिसली. त्यांनी रक्कम काढायची असल्याचे सांगितले असता, २ लाख २३ हजार भरून प्रीमियम खाते उघडावे लागेल, नंतरच पैसे काढता येतील, असे त्यांना सांगण्यात आले.
- आपली फसवणूक झाल्याचे लक्षात आल्यावर त्यांनी तातडीने पोलिस ठाण्यात धाव घेतली. त्यांनी दिलेल्या फिर्यादीवरून नवघर पोलिसांनी २ मार्चला गुन्हा दाखल केला आहे. वरिष्ठ निरीक्षक मिलिंद देसाई यांच्या मार्गदर्शनाखाली नवघर पोलिस आणि सायबर शाखा तपास करत आहे.

7) पुण्यनगरी पृ. पान क्र. 1

# मीरा-भाईंदर शहरात ४०० ठिकाणी होळी होणार

मीरा रोड : महाराष्ट्रात होळी हा सण पारंपरिक पद्धतीने साजरा करण्यात येतो. प्रत्येक जण आपापल्या पद्धतीने होळीचा सण साजरा करत असतो. मीरा-भाईंदर शहरात मोठ्या उत्साहात होळी साजरी केली जाते. मीरा-भाईंदर शहरात सार्वजनिक व खासगी अशा ३९४ ठिकाणी होळी साजरी करण्यात येणार आहे.

मीरा-भाईंदर शहरात सार्वजनिक ठिकाणी २२९ होळी व खासगी ठिकाणी १६५ होळीचे आयोजन करण्यात येणार असल्याची माहिती पोलीस आयुक्तालयात परवानगी घेण्यासाठी आलेल्या अर्जावरून माहिती देण्यात आली आहे. यावेळी कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊ नये यासाठी पोलीस दल सतर्क असणार असल्याचे पोलीस आयुक्तालयाकडून सांगण्यात आले आहे. होळीचा सण शांततेत पार पडावा यासाठी अनेक उपाययोजना देखील राबवण्यात येणार असल्याचे सांगण्यात आले आहे.

होळी सण साजरा करण्याबाबतच्या नियमावलीचे परिपत्रक लवकरच काढण्यात येणार आहे. आयुक्तालयाच्या हद्दीतील १६ पोलीस ठाण्यांचे प्रभारी अधिकारी हे त्यांच्या हद्दीत होळी सणाचे आयोजन करणाऱ्या सर्वांना एकत्र बोलावत होळी व धुलिवंदन सण शांततेत पार पडण्यासंदर्भात आयोजकांशी लवकरच बैठक घेणार आहेत. त्याचबरोबर होळी व धुलिवंदन सणाकरिता शहरात आयोजित करण्यात येणाऱ्या कार्यक्रमाच्या ठिकाणी पोलीस बंदोबस्त ठेवण्यात येणार आहे.

CS CamScanner
Scanned with CamScanner

दि. ०४/०३/२०२३

८) सकाळ पान क्र.4

# नालासोपाऱ्यातून अमली पदार्थ जप्त

नालासोपारा, ता. ३ (बातमीदार) : नालासोपारा पूर्वेतील प्रगतीनगरमध्ये तुलिंज पोलिसांनी धडक कारवाई करत, एका नायजेरियन व्यक्तीकडून ५८ लाख किमतीचे अमली पदार्थ जप्त केले. या प्रकरणात तुलिंज पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. संशयित आरोपीला वसई न्यायालयात हजर केले असता सात दिवसांची पोलिस कोठडी सुनावण्यात आली. नालासोपारा परिसरातील ही सर्वात मोठी कारवाई असून, अमली पदार्थांविरोधात भविष्यातही कारवाई सुरू राहील, असे मिरा-भाईंदर, वसई-विरार परिमंडळ ३ चे प्रभारी पोलिस उपायुक्त सुहास बावचे यांनी सांगितले.

प्रगतीनगर परिसरात एका नायजेरियन नागरिकाकडे अमली पदार्थ असून तो विक्री करत असल्याची माहिती तुलिंज गुन्हे प्रकटीकरण पथकाचे पोलिस उपनिरीक्षक बाळासाहेब बांदल यांना मिळाली होती. गुन्हे प्रकटीकरण पथकाने प्रगतीनगर परिसरात सापळा रचण्यात आला असता संशयित नायजेरियन व्यक्तीने पोलिसांना पाहून पळ काढला. पण पाठलाग करून त्याला पकडण्यात आले. त्याच्या अंगझडतीत १०२.४०० ग्रॅम वजनाचे १० लाख २४ हजाराचे एमडी हा अमली पदार्थ सापडला. त्याच्या घराची झडती घेतली असता १७ लाख २२ हजारांचे कोकेन आणि ३१ लाख २८ हजारांचे एमडीएमए, एस्क्टासी हे अमली पदार्थ मिळून आले. या प्रकरणी तुलिंज पोलिसांनी इदे इम्यानुवेल इदे पॉल (वय २६) याला अटक करत एकूण ५८ लाख ७४ हजारांचे अमली पदार्थ जप्त केले.

९) लोकमत पू. पान क्र.2

# धारावी किल्ल्यावर साजरा होणार विजय दिवस

लोकमत न्यूज नेटवर्क

मीरा रोड : भाईंदरच्या चौक डोंगरावरील धारावी किल्ल्यावर पहिल्यांदाच ६ मार्चला महापालिका विजय दिवस म्हणून साजरा करणार आहे. पोर्तुगीजांच्या ताब्यातून धारावी किल्ला मराठ्यांच्या ताब्यात आल्याच्या घटनेला ६ मार्चला २८४ वर्षे पूर्ण होत आहेत.

गडप्रेमींच्या आग्रहानंतर महापालिका आयुक्त दिलीप ढोले यांनी किल्ल्यावर ६ मार्च 'विजय दिवस' म्हणून साजरा करण्याचा निर्णय घेतला आहे. ६ मार्चला सायंकाळी ४ वाजता पालिकेने कार्यक्रमाचे आयोजन केले आहे. मात्र, धारावी किल्ल्याचे काही अवशेषच शिल्लक आहेत. डोंगरावर महापालिकेने नरवीर चिमाजी अप्पा यांचा अश्वारूढ पुतळा उभारला आहे. किल्ल्याच्या सुशोभीकरणासाठी राज्य शासन व पालिकेकडून १३ कोटींची तरतूद केली आहे. किल्ल्याचे सुशोभीकरण करणे तसेच इतिहासाची माहिती व्हावी, यासाठी प्रयत्नशील असल्याचे आयुक्त ढोले म्हणाले.

## असा आहे इतिहास

वसई किल्ल्याच्या अगदी समोर खाडी पलीकडे चौक डोंगरावर धारावी किल्ला आहे. वसईचा किल्ला जिंकण्यासाठी वा त्यावर नजर ठेवण्यासाठी धारावी किल्ला हा अतिशय मोक्याच्या जागी होता. समुद्रमार्गे येणारी रसद वा शस्त्रे - दारुगोळा तोडण्यासाठीसुद्धा धारावी किल्ला महत्त्वाचा होता. चिमाजी अप्पा यांनी ६ मार्च १७३९ रोजी पोर्तुगीजांच्या ताब्यातून धारावी किल्ला जिंकून घेतला होता. त्यामुळे गडप्रेमींकडून हा दिवस 'विजय दिवस' म्हणून मानला जातो.

१०) सकाळ पान क्र.4

# नालासोपाऱ्यात २८० रुपयांसाठी खून

नालासोपारा (बातमीदार) : २८० रुपयांसाठी एकाची नालासोपाऱ्यात निर्घृणपणे हत्या केल्याची घटना उघड झाली आहे. या प्रकरणात तुलिंज पोलिसांनी वसईच्या भोयदापाडा परिसरात राहणारा दीपक विनोद गुप्ता ऊर्फ बटला या संशयित आरोपीला बेड्या ठोकल्या आहेत. २५ फेब्रुवारीच्या मध्यरात्री अडीच वाजण्याच्या सुमारास गस्तीवरील पोलिसांना नालासोपारा पूर्व तुलिंज ओव्हर ब्रिजखाली आत्मवल्लभ इमारतीशेजारी व्यक्ती बेशुद्ध अवस्थेत सापडला होता. त्याच्यावर गंभीर स्वरूपाच्या जखमा होत्या. पोलिसांनी त्याला पालिकेच्या रुग्णालयात दाखल केले असता डॉक्टरांनी मृत घोषित केले. घटनास्थळावरील सीसी टीव्हीचा आधार घेऊन दीपक गुप्ता याला ताब्यात घेत चौकशी केली असता, मयत व्यक्तीने २८० रुपये उसने घेतले होते. ते मागितले असता शिवीगाळ करीत होता. या रागातून त्याची हत्या केली असल्याचे त्याने सांगितले.

CS CamScanner

Scanned with CamScanner



The police officers who nabbed the duo

# Inter-state gang of thieves busted; police recover 51 tempos and two cars

## Two held from Rajasthan, but mastermind, a dozen others still at large

DIWAKAR SHARMA
diwakar.sharma@mid-day.com

THE Mira Bhayandar Vasai Virar (MBVV) police have busted an inter-state gang of thieves who have been stealing tempos parked in various parts of India. Addressing a press conference, on Friday, MBVV Commissioner of Police Madhukar Pandey said that two men have been arrested and the cops have recovered 51 tempos of different makes and two cars from their possession.

Crime branch sleuths got a lead while investigating a theft case registered last December.

"A case regarding a stolen tempo was registered at Kashimira police station in December. The crime branch had started to conduct a parallel investigation into the matter. The officers busted an inter-state gang of thieves. The net worth of the confiscated 51 tempos and two cars is R4.75 crore. We have arrested two accused—Farooq Tayyab Khan, 36, and Mubin Haris Khan, 40—from Rajasthan's Alwar district. Both of them are drivers by profession and history-shelters," Pandey told media persons.

Crime branch Inspector Aviraj Kurhade told mid-day that the stolen tempo was taken to Rajasthan via the Mumbai-Ahmedabad highway.

"We studied footage from more than 500 CCTV cameras installed on the routes which the thieves had used after stealing the tempo in December 2022. We checked the stretch up to 1,200 km," said Kurhade, who was leading the investigation under the supervision of DCP (crime branch) Avinash Ambure.

While studying the CCTV footage, the crime branch sleuths noticed that the thieves had halted the stolen vehicle near the Gujarat-Rajasthan border where they changed the number plate and vital details of the tempo, including chassis as well as engine numbers.

"Though the number plates had been changed, other details like stickers as well as painted designs on the windshield of the stolen tempo were the same. We kept on examining the route of the vehicle via CCTV footage. At a toll naka in Rajasthan, we noticed that the tempo was allowed to go as toll fee was deducted through a FASTag; whereas, until now, the driver had been paying in cash at the toll naka to reach Rajasthan," said an officer privy to the investigation.

"We retrieved the details of the FASTag from the toll naka and retrieved the Know Your Customer (KYC) of the FASTag, and got a mobile number, which belonged to Farooq," said the officer.

The investigating team retrieved mobile tower locations based on the mobile number and learnt that they were along the routes of the stolen tempo. "We kept on tracking the routes in the CCTV footage and reached Alwar," said the officer.

"Thieving is common among the youth in Alwar," said another crime branch officer, who added, "The tempting offer of beautiful brides comes to those who have committed a good number of thefts. According to them, thieving is not an offence but a profession in the locality.

Inspector Kurhade said, "Whenever a police team arrives to arrest the thieves in their taluka, the whole village blocks the path of policemen and indulges in open firing and stone-pelting."

It was a dangerous bid to enter their den, so the MBVV cops, with the support of their counterparts in Alwar, gathered intelligence about Farooq.

"We learnt that Farooq would play cricket at a particular ground. After he reached there, we nabbed him. His interrogation led to the arrest of his accomplice Mubin. We can say that both of them are just cogs and the mastermind is still at large," Kurhade told mid-day.

"Over a dozen accused, including the mastermind, are yet to be arrested. We cracked the case on January 3 and took months to recover all the tempos stolen by the gang," he added.

The arrests have solved a total of 22 cases registered at various police stations in Delhi, Maharashtra, Uttar Pradesh and Haryana.





Farooq Tayyab Khan ; (right) Mubin Haris Khan PICS/HANIF PATEL

**22** No. of cases linked to thefts

'We learnt that Farooq would play cricket at a particular ground. After he reached there, we nabbed him. His interrogation led to the arrest of his accomplice. Mubin'

Aviraj Kurhade, inspector, crime branch



The stolen vehicles

Scanned with CamScanner

दैनिक समाचार पत्र | लखनऊ, कानपुर, उन्नाव, झाँसी, मथुरा व प्रयागराज से प्रसारित | RNI NO - UPHIN2007/22822

खबर सिर्फ जनहित के लिए

# पब्लिक पॉवर

सूर्या न्यूज़ 24
आपकी बुलन्द आवाज़

लखनऊ,शनिवार,04 मार्च, 2023 , वर्ष 06, अंक :161 पृष्ठ :08, मूल्य 2रू/-

## क्राइम ब्रांच यूनिट 1 (काशिमीरा) के हाथ लगी बड़ी कामयाबी दो शातिर अपराधी चोर के साथ 53 वाहन बरामद

मुंबई पवन पंडित
वसई : मीरा भाईंदर वसई विरार पुलिस आयुक्तालय अंतर्गत क्राईम ब्रांच यूनिट 1 की टीम ने अंतरराज्यीय गिरोह का पर्दाफाश करने मे बड़ी सफलता अर्जित की है,दरअसल टीम ने दो चोर को गिरफ्तार कर,22 मामलों की गुत्थी सुलझाते हुए 53 वाहन समेत कुल 4 करोड़ से अधिक का माल जप्त किया है। यह जानकारी पुलिस अधिकारी ने शुक्रवार को दी है।

पुलिस सूत्रों की माने तो पिछले कई महीनो मे वसई विरार क्षेत्र मे घटित वाहन चोरी की वारदातों को अंजाम देने वाले स्थानीय अपराधियों द्वारा नही दिया गया है.इन चोरी की वारदातों को एक अंतरराज्यीय गिरोह द्वारा दिया गया है.पक्की और पुख्ता जानकारियां हासिल कर गिरोह की खोजबीन शुरू कर दो ड्राइवरो को गिरफ्तार किया गया है और पुलिस टीम ने कुल 53 वाहन,जिसमे 48 आयशर टेम्पो 2 टाटा टेम्पो व 2 कारें जप्त किया गया है।बतादे कि काशिमीरा निवासी विनयकुमार पाल नामक शिकायतकर्ता ने अपनी आयशर कंपनी का ट्रक क्रमांक एम एच 04/जेके/8308 चोरी होने की शिकायत दर्ज कराया गया था बड़े पैमाने घटित वाहन चोरी की घटनाओं को गम्भीरता से लेते हुए मीरा–भाईंदर वसई विरार पुलिस कमिश्नर मधुकर पांडेय के आदेशानुसार क्राईम डीसीपी अविनाश अंबुरे ,एसीपी अमोल मांडवे के मार्गदर्शन क्राईम ब्रांच



यूनिट 01 पी.आई अविनाश कुराडे ,एपीआय कैलास टोकले,क्राईम ब्रांच वसई यूनिट 02 सुहास कांबले, राजू तांबे, संतोष लांडगे,पुष्पेंदर थापा,सचिन सावंत,प्रफुल्ल पाटील, विकास राजपूत, समीर यादव,प्रशांत विसपुते, सनी सूर्यवंशी आदि की टीम गठित किया गया, उसके बाद पुलिस टीम ने घटनास्थल और उसके आसपास लगे सीसीटीवी कैमरे खंगाले,फुटेज ट्रक मुंबई अहमदाबाद हाईवे की तरफ जाते हुए साफ दिखाई पड़ा,इस आधार पर टीम ने मुंबई अहमदाबाद हाईवे के बीच पड़ने वाले सीसीटीवी और टोल प्लाजा की जाँच पड़ताल की गयी। इस तरह से क्राईम ब्रांच की टीम ने महाराष्ट्र, गुजरात, मध्यप्रदेश और राजस्थान तक पहुँची, लेकिन ट्रक चोर बड़ा शातिर अपराधी था,उसने नंबर प्लेट बदल लिया व रेवाड़ी टोल प्लाजा पर फास्ट टैग से टोल अदा किया,चोर की बस यही गलती पुलिस को अहम सुराग हाथ लग गया व उस तक पहुँच गयी, इस कार्यवाही के दौरान क्राईम ब्रांच यूनिट 01 की टीम ने चौपानकी पुलिस थाने राजस्थान, एस ओ जी राजस्थान, पैथापुर गाँधीनगर और क्राईम ब्रांच अहमदाबाद गुजरात की मदद से दो आरोपियों को राजस्थान से धरदबोचा गया,जिनका नाम रुकरूदीन नामा पोस्ट टपुग्रा ता .तीजरा जिला अलवर राजस्थान निवासी फारुख तैय्यबखान (38)व मुबिन हारिस खान (40) को गिरफ्तार कर दोनों को मीरा– भाईंदर लाया गया। पूछताछ करने पर चोरी करने की बात कबूली । अधिक पूछताछ करने पर दोनों द्वारा अपने द्वारा किए गए चोरी की वारदातों की गिनती से पुलिस हैरान रह गयी,दोनों द्वारा महाराष्ट्र, गुजरात, मध्यप्रदेश और राजस्थान आदि हैवी वाहनो की चोरी करने की बात कही,इस तरह से टीम ने कुल 53 वाहन बरामद किया है।कमिश्नर मधुकर पांडेय ने बताया कि इनकी गिरफ्तारी से क्राइम ब्रांच टीम ने कुल 22 अपराधों ( चोरी ) की गुत्थी सुलझा ली है, व 53 वाहन जप्त किए गए है.जिसकी कुल कीमत 4 करोड़ 75 लाख रुपये आकी गयी है.फिलहाल उक्त मामले मे सभी पहलु पर क्राईम ब्रांच छानबीन कर रही है।



## गौला खनन संघर्ष समिति का आज 83 वें दिन धरना जारी रहा, त्यौहार के मद्देनजर कोतवाल ने शांति व्यवस्था बनाये रखने को कहा

मुन्ना अंसारी
लालकुआँ :– गौला खनन संघर्ष समिति का मोटाहल्दू क्षेत्र में चल रहा धरना आज 83 वे दिन भी जारी रहा । लालकुआँ डिवीजन के वाहन स्वामी अपनी मागो को लेकर बैठे हुए है । वाहन स्वामियो का कहना है सरकार ने उनकी सभी मागे मान ली है लेकिन स्टोन क्रेशर वाले उचित भाड़ा देने को राजी नही है जिससे खनन कार्य में देरी हो रही है। आज लालकुंआ कोतवाली के प्रभारी निरीक्षक डी आर वर्मा ने गौला खनन



संघर्ष समिति के साथ बैठक की जिसमे उन्होंने कहा कि होली को देखते हुए शांतिपूर्ण रूप से अपने आंदोलन को चलाये जाने के लिए कहा गया । जो गाडियां ओवरलोड आ रही है उनको रोके लेकिन उक्त विभाग को सूचित कर उन गाड़ियों को उनके हवाले करे । गौला संघर्ष समिति संयोजक रमेश चन्द जोशी ने कहा कि जब तक उचित रेट नही मिलेगा तब तक लालकुआं डिवीजन के कोई भी गेटो से वाहन नदी में प्रवेश नही करेगे वही उन्होने कहा कि अधिकारियो द्वारा भी अनदेखी की जा रही है उनके द्वारा कोई सहयोग नही दिया जा रहा है जिससे करोडों का राजस्व का नुकसान सरकार को हो रहा है । आज धरना देने वालों मे अध्यक्ष सुरेश चंद्र जोशी, सचिव इंदर सिंह नयाल, कोषाध्यक्ष रमेश चंद्र जोशी, गणेश बिरखानी, सावन पथनी, अमित शाह, नवीन जोशी, रमेश कांडपाल, मदन उपाध्याय, पूरन पाठक, राजू चौबे कमल बिष्ट सहित सैकड़ों वाहन स्वामी मौजूद थे ।

Scanned with CamScanner

MHT
Available on Print
News Portal -
Youtube channel
Instagram
Facebook
Twitter

CMYK

MHT

# मुंबई हिंदमाता टाइम्स

राष्ट्रीय हिन्दी दैनिक

मुंबई, शनिवार 04 मार्च 2023

सम-सामयिक घटनाओं की जानकारी रखने वाले अनुभवी, इच्छुक महिला व पुरुष पत्रकारों की आवश्यकता है। वेतन योग्यतानुसार दिया जाएगा। मो.9867314765
- संपादक

संपादक : विजय आर. सिंह | RNI No. MAHHIN/2006/20347 | E-mail: mumbaihindmatatimesnews@gmail.com | Website : www.mumbaihindmatatimes.com | वर्ष-18, अंक-54 | पृष्ठ-8 | मूल्य ₹3/- | संरक्षक: राजन पांडेय/सुमित आचार्य

| आज का पंचाग | सूर्योदय / सूर्यास्त | आज का मौसम | तापमान | शेयर बाजार | सर्राफा बजार |
|---|---|---|---|---|---|
| फाल्गुन, शुक्ल पक्ष, द्वादशी तिथि | 6.48am 6.21pm | सुबह मौसम थोड़ी ठंड दिन में तापमान बढ़ने की संभावना | अधिकतम 36°C न्यूनतम 25°C | NSE OPEN 17,594.35 \| CLOSE 17,451.25 BSE OPEN 59,241.20 \| CLOSE 58,909.35 | GOLD 57,770 Per 10 Gm SILVER 66,900 Per Kg |

# अश्लील मैसेज भेजने वाला आरोपी गिरफ्तार



**विरार:** वसई विरार में रहने वाली नाबालिक युवतियां व महिलाओं को फोन कर अश्लील बाते और सोसल मीडिया पर अश्लील फोटो, विडियो भेज कर परेशान करने वाले आरोपी को विरार पुलिस ने २४ घंटे में गिरफ्तार कर लिया है। आरोपी सोनू कनौजिया उम्र 35 साल जो की डोंबिवली पूर्व में एक कपड़े स्त्री करने वाली दुकान में काम करता था आरोपी सोनू कनौजिया को विरार की रहने वाली एक युवती का फोन नंबर मिला और फिर उसने लड़की को फोन किया लड़की की आवाज आने पर आरोपी ने पीड़ित लड़की को व्हाट्सएप पर अश्लील वीडियो और फोटो भेजना शुरू कर दिया इस बात को लेकर लड़की काफी डर गई और वारदात की बात अपने पिता को बताई जब पीड़िता के पिता ने आरोपी को फोन किया तो आरोपी ने पीड़िता के पिता को गाली गलौच करते हुए कहा की तुम मुझे कभी नही पकड़ पाओगे ,इसी बात को गंभीरता से लेते हुए पीड़िता के पिता ने विरार पुलिस निरीक्षक राजेंद्र कांबले से शिकायत की उक्त घटना की जांच पड़ताल कर गुन्हे प्रकटीकरण विभाग को डोंबिवली रवाना किया और पुलिस ने 24 घंटे के अंदर आरोपी को अपने हिरासत में लिया पुलिस के अनुसार आरोपी अपने दुकान पर आने वाली महिलाओं का फोन नंबर लेता था फिर उन्हे अश्लील मैसेज किया करता था। पुलिस हिरासत के बाद आरोपी के ऐसे कई खुलासे सामने आ रहे है। इसके साथ ही विरार पुलिस के पुलिस निरीक्षक राजेंद्र कांबले ने स्थानिक महिलाओं व युवतियों को संदेश दिया की महिलाए अनजान लोगो को अपना फोन नंबर देने से परहेज करे जिससे वे होनेवाली घटनाओं से महफूज रहे।

Scanned with CamScanner

मुंबई हिंदमाता टाइम्स
Available on Print
News Portal - www.mumbaihindmatatimes.com
Youtube channel
Instagram
Facebook
Twitter

CMYK

MHT
# मुंबई हिंदमाता टाइम्स
राष्ट्रीय हिन्दी दैनिक

मुंबई, शनिवार 04 मार्च 2023

संपादक : विजय आर. सिंह | RNI No. MAHHIN/2006/20347 | E-mail: mumbaihindmatatimesnews@gmail.com | Website : www.mumbaihindmatatimes.com | वर्ष-18, अंक-54 | पृष्ठ-8 | मूल्य ₹3/- | संरक्षक: राजन पांडेय/सुमित आचार्य

सम-सामयिक घटनाओं की जानकारी रखने वाले अनुभवी, इच्छुक महिला व पुरुष पत्रकारों की आवश्यकता है। वेतन योग्यतानुसार दिया जाएगा।
मो. 9867314765
- संपादक

| आज का पंचांग | सूर्योदय / सूर्यास्त | आज का मौसम | तापमान | शेयर बाजार | सराफा बजार |
|---|---|---|---|---|---|
| फाल्गुन, शुक्ल पक्ष, द्वादशी तिथि | 6.48am 6.21pm | सुबह मौसम थोड़ी ठंड, दिन में तापमान बढ़ने की संभावना | अधिकतम 36°C न्यूनतम 25°C | NSE OPEN 17,594.35 CLOSE 17,451.25; BSE OPEN 59,241.20 CLOSE 58,909.35 | GOLD 57,770 Per 10 Gm; SILVER 66,900 Per Kg |

# नालासोपारा में पकड़ा गया लाखों रुपये ड्रग्स, नाईजीरियन गिरफ्तार

## आरोपियों के पास कोकिन 171.250 ग्राम बरामद





**वसई ;** 58 लाख 74 हजार रुपये का ड्रग्स रखने वाला नाईजीरियन आरोपी को तुलिंज थाने की क्राइम डिटेक्शन की टीम ने गिरफ्तार करने में सफलता अर्जित की है। यह सफलता परिमंडल 2 डीसीपी सुहास बावचे व एसीपी शशिकांत भोसले के मार्गदर्शन में तुलिंज थाने के पीआई शैलेंद्र नगरकर के नेतृत्व में क्राइम डिटेक्शन के अधिकारी व कर्मचारी ने दिलाई है। यह जानकारी पुलिस अधिकारी ने गुरुवार को दी है।

पुलिस ने बताया कि 1 मार्च को तुलिंज थाने के क्राइम डिटेक्शन के पुलिस उपनिरीक्षक बांदल को गुप्त सूचना मिली कि एक नाईजीरियन शख्स ड्रग्स विक्री करने नालासोपारा पूर्व के प्रगति नगर क्षेत्र में आने वाला है,इस संबंध में क्राइम डिटेक्शन टीम के अधिकारियों व कर्मचारियों को वरिष्ठ अधिकारियों से प्राप्त समाचारों का सत्यापन कर कार्रवाई करने के आदेश प्राप्त हुए,उक्त सूचना के आधार पर क्राइम डिटेक्शन टीम ने एक नाईजीरियन शख्स नालासोपारा पूर्व, प्रगतिनगर जीवदानी हॉल स्थित आया,जैसे ही वह भागने लगा तो पुलिस टीम के अधिकारियों और कर्मचारियों ने उसका पीछा किया और नाईजीरियन शख्स इदे इम्यानुवेल इदे पॉल (26) को हिरासत में लिया,उसके शरीर की तलाशी ली गई तो उसके पास से 1,24,000 रुपये के एमडी ड्रग्स वजन 102.400 ग्राम पाया गया।

उक्त शख्स के आवास की तलाशी लेने पर 17,22,500/- रुपये के कोकीन वजन 171.250 ग्राम व 31,28,300 रुपये की 223.45 ग्राम एमडीएमए/ईसीएसटीएएसवाय ड्रग पाए जाने के बाद इसे जब्त कर लिया गया।पुलिस ने कहा कि उक्त आरोपी के खिलाफ तुलिंज थाने में एनडीपीएस एक्ट के तहत एफआईआर दर्ज किया गया है।

Scanned with CamScanner

# FASTag helps cops bust pan-India truck lifter gang

SURESH GOLANI / Mira-Bhayandar

The crime branch unit (Zone-I) of the Mira Bhayandar-Vasai Virar (MBVV) police busted a Rajasthan-based interstate gang involved in a spate of truck-lifting cases. The action followed in response to a case of truck theft registered at the Kashimira police station in December 2022. CCTV footage and a FASTag deduction alert at a toll gate proved helpful in arresting two members of the gang after the police team patiently camped on the outskirts of a village in Rajasthan for two months.

**53 trucks with a collective value of ₹4.75 crore seized; two held**

The suspects – Farookh Tayyab Khan, 36, and Mubin Haris Khan, 40 – are natives of Tapukara village in Alwar district of Rajasthan. Sustained interrogation led to the seizure of 53 stolen vehicles from various parts of the country, especially the North-east region, which has turned into a dumping ground for stolen vehicles as they easily get sold at throwaway prices.

"The gang members would lift unguarded vehicles, change their chassis / engine numbers and sell them to unsuspecting buyers in other states by fabricating documents," MBVV Police Commissioner Madukar Pandey said. He added that the police are on the lookout for 7-8 gang members who are absconding and their arrests can lead to more seizures and additional cases being solved.

The value of 53 recovered vehicles – including 48 Eicher trucks, two Tata tempos, one Ashok Leyland truck and two cars – amount to more than Rs4.75 crore. While the origin states of 22 vehicles have been identified, efforts are on to track the owners.

Scanned with CamScanner

# CYBER CROOKS DUPE BANKER'S WIFE OF ₹4L IN ONLINE JOB SCAM

SURESH GOLANI / Mira-Bhayandar

In yet another cyber fraud in Bhayandar, a 31-year-old woman, the wife of a bank manager, was duped of Rs3.99 lakh under the guise of an online marketing task.

In her complaint to the Navghar police, the complainant, who works with a private firm in Navi Mumbai, stated that she received a message on her WhatsApp number from an unknown sender about a part-time online marketing job offering lucrative commissions of Rs2,000 to Rs5,000 per day on completion of sale-related online tasks. The complainant clicked on a link and uploaded her details, following which the cyber crook gave her a joining code and asked her to deposit Rs2000 for the first task. To win her confidence, the crooks generated fake account statements of the commission totalling to Rs3.99 lakh and her account showed a balance of Rs5.36 lakh.

However, she was neither able to withdraw the commission nor the invested amount. When she enquired, she was asked to deposit another Rs2.23 lakh to withdraw her profit.

MUM
CYBER

#cybersafemu
Report cybercrime on Helpline **1930**,

Scanned with CamScanner

NBT नवभारत टाइम्स

# अंतरराज्यीय वाहन गिरोह का भंडाफोड़

**कई महीने तक गैराज में पुलिस अधिकारी मैकेनिक बनकर रहा**

**उत्तर-पूर्व राज्यों से गाड़ियों की होती थी 'हेराफेरी'**





अंतरराज्यीय गिरोह का भंडाफोड़ करने में मीरा-भाईंदर वसई-विरार पुलिस को सफलता मिली।

■ **निसं, मीरा-भाईंदर:** वाहनों की चोरी करने वाले एक अंतरराज्यीय गिरोह का भंडाफोड़ करने में मीरा-भाईंदर वसई-विरार पुलिस को सफलता मिली है। पुलिस ने 2 आरोपियों को गिरफ्तार कर 2 कार और 55 ट्रक जब्त किया है, जिसका बाजार मूल्य 5 करोड़ रुपये से अधिक है। पुलिस आयुक्त मधुकर पांडेय ने बताया कि वाहन चोरी के मामले में पुलिस को एक अंतरराज्यीय गिरोह के शामिल होने की बात पता चली। लगभग 2 महीने की मेहनत और छानबीन के बाद इस गिरोह का भंडाफोड़ हुआ। राजस्थान के अलवर जिले से पुलिस ने दो आरोपियों को गिरफ्तार किया और महाराष्ट्र, दिल्ली, हरियाणा और उत्तर प्रदेश के वाहन चोरी के 22 मामलों को भी सुलझाया। इस गिरोह के बारे में सुराग लगाने के लिए पुलिस अधिकारी कई महीने तक गैराज में मैकेनिक के रूप में काम करते रहे। पुलिस आयुक्त ने बताया कि उत्तर-पूर्व के कई राज्यों में 10 वर्ष के बाद गाड़ियों को स्क्रैप कर दिया जाता है। गिरोह के लोग ऐसी गाड़ियों के फर्जी पेपर बनाकर चोरी किए गए वाहनों को बेचते थे। उपायुक्त अविनाश अंबुरे के मार्गदर्शन में एपीआई अविराज कुराडे की टीम ने इस बड़े गिरोह का भंडाभोड़ किया। इस टीम में संजय पाटिल, पुष्पेंद्र थापा, संतोष चव्हाण, विकास राजपूत शामिल थे।

**2 कार सहित 55 ट्रक किए गए बरामद**

**• अमित तिवारी**

Scanned with CamScanner